# —: प्रेस नोट :—

दिनांक : १९/०१/२०१९

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०४/२०१९ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) |
| आरोपी व कार्यालय | राजेंद्र शंकर सोनवणे, वय ४९ वर्षे, पद — कार्यकारी अभियंता, (वर्ग—१), नाशिक सार्वजनिक आरोग्य विभाग, कार्यालय—उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,५०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती रु. १,००,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी शासकिय कंत्राटदार असुन त्यांनी ता. मलकापूर, जि. बुलढाणा येथील, प्राथमिक आरोग्य केंद्र, नरवेलचे नवीन मुख्य इमारतीचे बांधकाम करण्याकरीता अंदाजे. १.५ कोटी रुपयाची निविदा भरली होती. ई—निविदेव्दारे त्यांना नमुद काम बहाल करण्यात आले होते. सदर कामाच्या कार्यारंभ आदेशाकरीता यातील लोकसेवकाने रु. १,५०,०००/— लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करून सापळा रचण्यात आला. सापळा कारवाईमध्ये लोकसेवक राजेंद्र शंकर सोनवणे यांना अधिक्षक अभियंता कार्यालय, पायाभुत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, पी. डिमेलो रोड, मुंबई—१ या कार्यालयात फिर्यादीकडून तडजोडी अंती रू. १,००,०००/— लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**वेबसाईट — acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,**
**ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,**
**फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB.**
**मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net**
**व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००**

( एम.एन.मुगुटराव )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.

Scanned by CamScanner